तरुण भारत

# 'बिट्स पिलानी'तर्फे जी-२० कार्यक्रम

## 'हवामान बदल व आपत्तीचा धोका', युनिव्हर्सिटी कनेक्ट इव्हेंट उपक्रम, युवा व्यवहार, क्रीडा, परराष्ट्र मंत्रालयाचे सहकार्य

प्रतिनिधी
वास्को

सांकवाळ येथील बिट्स पिलानी के के बिर्ला कॅम्पसतर्फे जी-२० कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात 'हवामान बदल आणि आपत्तीचा धोका' या विषयावर पहिल्या सत्रात चर्चा करण्यात आली व ६९वा जी-२० युनिव्हर्सिटी कनेक्ट इव्हेंट सायंकाळच्या सत्रात घेण्यात आला. सदर कार्यक्रमाला युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्रालय व परराष्ट्र मंत्रालयाचे सहकार्य लाभले.

याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून भटनागर फेलो आणि नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ ओशनोग्राफी गोवाचे संचालक प्रा. सुनील सिंग उपस्थित होते. बिट्स पिलानी गोवा कॅम्पसचे संचालक प्रा. सुमन कुंडू यांनी स्वागत केले. प्रमुख पाहुणे प्रा. सिंग यांनी अरबी समुद्रातील वाढते तापमान व गोव्यातील अर्थव्यवस्थेवर होणाऱ्या परिणामांविषयी विचार मांडले. आरआयएसच्या गव्हर्निंग कौन्सिलचे अध्यक्ष डॉ. शेषाद्री च्यारी यांनी व्हाय-२० आणि जी-२० कार्यक्रमातील बैठकीची माहिती दिली. या बैठकीत हवामान बदल आणि त्याचे गोव्यावर होणारे परिणाम या विषयी चर्चा करण्यात आली.



**सांकवाळ : जी२० युनिव्हर्सिटी कनेक्ट कार्यक्रमाचे उद्घाटन करताना डॉ. सेषांद्री च्यारी. सोबत प्रा. वेंकट राव, प्रा. सविता केरकर व प्रा. सुमन कुंडू.**

डॉ. राजीव कुमार चतुर्वेदी व डॉ. बाप्पा दास यांनी हवामान बदलामुळे आपत्ती कशा उद्भवतात व गोव्यावर त्याचा परिणाम कसा होतो. नवीन आव्हाने कशी निर्माण होत आहेत, याबद्दल चर्चा केली. गौरी मळकर्णेकर, डॉ. प्रदीप सरमोकादम, अभियंता श्रुती आडपईकर, गोपाल सरकटे, प्रतिक घोलप यांनी विचार मांडले. गोवा वन विभागाचे वन अधिकारी अमित गेमावत यांचाही समावेश होता. या कार्यक्रमाला उपजिल्हाधिकारी, मामलेदार, आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जैवविविधता व्यवस्थापन समितीचे अधिकारी, महाविद्यालयीन विद्यार्थी, प्राध्यापक, बिट्स पिलानी, गोवा विद्यापीठ व आयआययूएलइआरचे प्रतिनिधी उपस्थित होते.

**बिट्स पिलानी गोवातर्फे जी-२० दरम्यान विद्यापीठ कनेक्ट कार्यक्रम**

जी-२० युनिव्हर्सिटी कनेक्ट इव्हेंटमध्ये बिट्स पिलानीसह गोव्यातील महाविद्यालये व विद्यापीठातील विद्यार्थ्यांचा समावेश होता. जी-२० युनिव्हर्सिटी कनेक्टमध्ये वक्त्यांची हवामान बदल आणि भारताचे जी-२० मध्ये अध्यक्षपद या विषयावर व्याख्याने झाली.

नवी दिल्ली येथील आरआयएस बोर्ड ऑफ गव्हर्नर्स डॉ. सेषांद्री च्यारी, आयआययुएलईआर गोवाचे कुलगुरु प्रा. व्यंकट राव, गोवा विद्यापीठाच्या डीन प्रा. सविता केरकर व बिट्स पिलानी गोवा कॅम्पसचे संचालक प्रा. सुमन कुंडू यांचा यात समावेश होता.

प्रा. राजीवकुमार चतुर्वेदी, डॉ. रमेश कुमार यांच्यातर्फे विद्यार्थ्यांसाठी प्रश्नमंजूषा स्पर्धा घेण्यात आली. स्पर्धेत तीस विद्यार्थी विजयी ठरले. त्यांचा मान्यवरांच्याहस्ते गौरव करण्यात आला.